भूसंपादन अधिनियम -१८९४ व भूसंपादन अधिनियम - २०१३ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबतचे अभिलेख अद्ययावत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.७५/अ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१३ सप्टेंबर, २०१७.

परिपत्रक:-

भूसंपादन अधिनियम १८९४ व भूसंपादन अधिनियम २०१३ च्या तरतूदी अंतर्गत सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी मालकीच्या जमीनी संबंधित जिल्ह्यातील महसूल यंत्रणेकडून संपादित करुन संपादक संस्थेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत वा येत आहेत. भूसंपादन कायद्यान्वये संबंधित संपादक संस्थेने आवश्यक तेवढीच खाजगी जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे या बाबीचे काटेकारपणे पालन न झाल्यामुळे संबंधित संपादक संस्थेच्या मागणीनुसार खाजगी जमीन संपादित करण्यात येते. व त्यामुळे संपादित जमिनीपैकी काही संपादित जमीन विनावापर पडून राहते. अशा विनावापर पडून राहिलेल्या जमिनीचे मूळ मालक ती जमीन कसत असतात. या बाबीचा गैरफायदा घेऊन संबंधित मूळ मालक ती जमीन अनधिकृतपणे इतरांना खरेदी विक्री करीत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. याअनुषंगाने विधी मंडळामध्ये तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सदरहू बाब वारंवार उपस्थित करण्यात आलेली आहे. त्यामुळे अशा प्रकरणास आळा बसावा, या अनुषंगाने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंबंधात सर्वंकष विचार करुन शासन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

१) भूसंपादन अधिनियम -१८९४ च्या तरतूदीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीबाबतचे अभिलेख (७/१२ नोंद तसेच फेरफार नोंद) अद्ययावत करणे आवश्यक असल्यामुळे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने त्याबाबतचा आढावा सर्वप्रथम घेण्यात यावा.

२) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने संपादित जमिनीबाबतचे अभिलेख अद्ययावत करण्यासाठी संबंधित विशेष भूसंपादन अधिकारी/उप विभागीय अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील संपादित जमिनीबाबतच्या अभिलेखांची तपासणी करुन ते अद्ययावत करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

३) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विशेष भूसंपादन अधिकारी/उप विभागीय अधिकारी यांनी संपादित जमिनीबाबतचे अभिलेख अद्ययावत केल्याबाबतची खात्री करावी व त्यांच्या अधिपत्याखालील भूसंपादन कार्यालयाने संबंधित कार्यवाही पूर्ण केल्याबाबत प्रमाणित करावे.

४) वरील क्रमांक १,२ व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणेची कार्यवाही भूसंपादन अधिनियम २०१३च्या तरतूदीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीबाबतही विनाविलंब/तातडीने करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांच्या अधिपत्याखालील विशेष भूसंपादन अधिकारी/उप विभागीय अधिकारी यांना सक्त सूचना निर्गमित कराव्यात.

५) सदरहू कार्यवाही करण्यास हलगर्जीपणा करणा-या विशेष भूसंपादन अधिकारी/उप विभागीय अधिकारी यांच्याविरुध्द संबंधित जिल्हाधिकारी यांनी शिस्तभंग कार्यवाही सुरु करावी.

६) संबंधित जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

उपरोक्त बाबी संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांच्या तातडीने निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७०९१३१६१८१९३२१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2017.09.13 16:08:09 +05'30'

(सु.कि.गावडे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) अ.मु.स./ प्रधान सचिव/ सचिव, सर्व प्रशासकीय विभाग.
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सह जिल्हा निबंधक कार्यालये (नोंदणी व मुद्रांक) सर्व जिल्हे.
५) निवड नस्ती/अ-१.